RNI NO. MAHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : ७३

दि.०९ जुलै २०२६, वार : गुरूवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

# दैनिक महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990

# मुंबईतील पूरस्थितीवर कायमस्वरुपी उपाय म्हणून १३ हजार कोटींचा एकात्मिक पूर नियंत्रण आराखडा केंद्र शासनाला सादर - मुख्यमंत्री

## सर्वांगीण विकासासाठी पायाभूत सुविधा, पुनर्विकास, आधुनिक तंत्रज्ञानावर भर

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई आणि मुंबई महानगर प्रदेशाच्या (एमएमआर) सर्वांगीण विकासासाठी राज्य शासनाने पायाभूत सुविधा, पूरनियंत्रण, पुनर्विकास, आधुनिक तंत्रज्ञान, जलसुरक्षा, वाहतूक व्यवस्था, आरोग्य सेवा आणि पारदर्शक प्रशासन यांचा समन्वय साधणारे व्यापक नियोजन हाती घेतले आहे. या माध्यमातून मुंबईला भविष्यातील जागतिक दर्जाचे, सुरक्षित आणि सक्षम महानगर म्हणून विकसित करण्यात येत आहे. तसेच मुंबईतील पूरस्थितीवर कायमस्वरूपी उपाय म्हणून १३ हजार कोटी रुपयांचा एकात्मिक पूरनियंत्रण आराखडा केंद्र शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आला आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत मुंबई आणि एमएमआर क्षेत्रावरील नियम २९३ अन्वये सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनी मांडलेल्या प्रस्तावाच्या चर्चेच्या उत्तरात दिली.

शहरातील ३७० पूरप्रवण ठिकाणी पावसाचे पाणी अवघ्या ३० मिनिटांत बाहेर काढण्याची व्यवस्था उभारली जाणार आहे. पूरनियंत्रणासाठी सध्या ५४७ पंप कार्यरत असून एमएमआरडीए, रेल्वे आणि इतर यंत्रणांसह एकूण ९९० पंप उपलब्ध आहेत. सहा मोठी आणि दहा मिनी पंपिंग स्टेशनही कार्यरत आहेत. यंदा अपेक्षित प्रमाणाच्या ११२ टक्के नालेसफाई करण्यात आली असून मिठी नदीतील ८३ टक्के गाळ काढण्यात आला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, यंदा मुंबईत अवघ्या सहा दिवसांत जुलै महिन्याच्या सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाला. सहा दिवसात कुलाबा येथे ८८२ मिमी आणि सांताक्रूझ येथे ९८८ मिमी पावसाची नोंद झाली. केवळ सहा दिवसांत वार्षिक पावसाच्या सुमारे ४२ टक्के पाऊस झाला. ताशी ५० ते ७५ किलोमीटर वेगाचे वारे आणि चार मीटरपेक्षा अधिक उंच भरतीमुळे परिस्थिती अधिक गंभीर झाली. अशा परिस्थितीतही विविध यंत्रणांनी प्रभावी कामगिरी केली.

नालेसफाईतील गैरव्यवहार रोखण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित फसवणूक शोध प्रणाली लागू करण्यात आली असून, खोटे दावे, चुकीची बिले आणि बनावट माहितीवर प्रभावी नियंत्रण आले आहे. या प्रणालीमुळे २०२५ मध्ये साडेबारा कोटी रुपये आणि २०२६ मध्ये ९.२५ कोटी रुपयांचा दंड संबंधित कंत्राटदारांवर आकारण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली. ब्रिमस्टोवॅड प्रकल्पातील उर्वरित कामे पुढील एक-दोन वर्षांत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असून, त्याचबरोबर मुंबईच्या दीर्घकालीन पूरनियंत्रणासाठी एकात्मिक आराखड्याची अंमलबजावणी करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.


कनेक्टिंग लिंक प्रकल्प हा केवळ वाहतूक प्रकल्प नसून महाराष्ट्राच्या अभियांत्रिकी क्षमतेचे प्रतीक असल्याचे सांगताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, या प्रकल्पात जगातील सर्वात रुंद बोगदा, भारतातील सर्वाधिक उंच व्हायाडक्ट आणि सर्वाधिक उंच केबल-स्टेड पूल उभारण्यात आला आहे. अलीकडील अतिवृष्टीत जलवाहिनीचे नुकसान झाले असले तरी बोगदा आणि पुलाला कोणतीही संरचनात्मक हानी झाली नाही. आपत्कालीन यंत्रणांनी अवघ्या १८ तासांत वाहतूक पूर्ववत केली असल्याची माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.

**पारदर्शक प्रशासन आणि डिजिटल नियंत्रण**

मुंबई महानगरपालिकेच्या प्रशासनात पारदर्शकता आणण्यासाठी ई-निविदा, एसएपी प्रणाली आणि डिजिटल नियंत्रण प्रणाली लागू करण्यात आली आहे. शालेय साहित्य खरेदीत तसेच माहिती तंत्रज्ञान विभागातील निविदांमध्ये मोठी बचत झाली आहे. तसेच अवास्तव खर्चाच्या १,०३२ कोटी रुपयांच्या निविदा रद्द करण्यात आल्या आहेत.

**जलसुरक्षेसाठी पाणी पुरवठा यंत्रणेचे आधुनिकीकरण**

मुंबईच्या वाढत्या पाण्याच्या गरजा पूर्ण करण्यासाठी गारगाई प्रकल्पास आवश्यक वनमंजुरी मिळाली असून २०२९ पर्यंत ५०० एमएलडी अतिरिक्त पाणी उपलब्ध होणार आहे. मनोरी आणि वर्सोवा येथे डिसॅलिनेशन प्रकल्प उभारले जात असून २०३० पर्यंत एक हजार एमएलडी गोडे पाणी उपलब्ध करण्याचे नियोजन आहे. एमएमआरच्या वाढत्या पाणी गरजा लक्षात घेऊन पाणी पुरवठा योजनेचे




आधुनिकीकरण करण्याचे नियोजन असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

**काँक्रीट रस्ते, बोगदे आणि पार्किंग प्रकल्पांना गती**

रस्त्यांच्या दर्जात सुधारणा करण्यासाठी मुंबईतील ९५ टक्के रस्ते काँक्रीटीकरण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. पहिल्या टप्प्यातील ८९ टक्के आणि दुसऱ्या टप्प्यातील ७३ टक्के काम पूर्ण झाले असून मे २०२७ पर्यंत संपूर्ण प्रकल्प पूर्ण करण्याचा प्रयत्न आहे. वाहतूक व्यवस्थेला अधिक सक्षम करण्यासाठी गोरेगाव-मुलुंड बोगदा, उत्तर किनारी मार्ग, विविध उड्डाणपूल, रेल्वे उड्डाणपूल आणि ईस्ट-वेस्ट कनेक्टिव्हिटी प्रकल्प वेगाने पूर्ण केले जात आहेत. बहुमजली रोबोटिक पार्किंग आणि भूमिगत पार्किंग सुविधांनाही गती देण्यात येत आहे.

**घनकचरा व्यवस्थापन आणि आरोग्य सुविधा**

घनकचरा व्यवस्थापनासाठी ६०० मेट्रिक टन क्षमतेचा वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्प उभारण्यात येत असून त्यातून सुमारे ८ मेगावॅट वीज निर्मिती होणार आहे. आरोग्य क्षेत्रात सायन रुग्णालय, नायर रुग्णालय तसेच उपनगरीय रुग्णालयांचा विस्तार करण्यात येत असून सुमारे तीन हजार अतिरिक्त रुग्णशय्या उपलब्ध होणार आहेत. सर्व रुग्णालयांचा डेटा एकत्रित करणारी एचएमआयएस प्रणाली विकसित करण्यात आली आहे.

स्वयंपुनर्विकासाला गती >> पान २

# लातूर जिल्ह्यात खरीप हंगामासाठी सुधारीत पीक विमा योजना लागू; ३१ जुलै २०२६ पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** सन २०२६-२७ या वर्षापासून शासनाने खरीप हंगामासाठी सुधारीत प्रधानमंत्री पीक विमा योजना लागू केली आहे. लातूर जिल्ह्यामध्ये ही योजना एस.बी.आय जनरल इन्शुरन्स कंपनी लि. पुणे यांच्यामार्फत राबविण्यात येत आहे. या योजनेत सहभागी होण्यासाठी अंतिम मुदत ३१ जुलै २०२६ अशी निश्चित करण्यात आली असून, शेतकऱ्यांना योजनेचा लाभ घेण्यासाठी 'ई-पीक' नोंदणी करणे आणि 'फार्मर आयडी' असणे अनिवार्य करण्यात आले आहे. ही योजना अधिसूचित मंडळात अधिसूचित पिकांसाठी लागू असून कर्जदार व बिगर कर्जदार अशा दोन्ही प्रकारच्या शेतकऱ्यांसाठी ती पूर्णपणे ऐच्छिक आहे.

योजनेंतर्गत ७० टक्के जोखीमस्तरावर विविध प्रमुख पिकांसाठी प्रति हेक्टर विमा संरक्षित रक्कम आणि शेतकऱ्याने भरावयाचा विमा हप्ता निश्चित करण्यात आला आहे. यामध्ये सोयाबीनसाठी ६२ हजार ५०० रुपये विमा संरक्षित रक्कमेवर १ हजार २५० रुपये हप्ता, कापसासाठी ६२ हजार रुपये संरक्षित रक्कमेवर १ हजार ५४३.८० रुपये हप्ता, खरीप ज्वारीसाठी ३३ हजार रुपये संरक्षित रक्कमेवर ६६० रुपये हप्ता, तर बाजरीसाठी ३२ हजार रुपये संरक्षित रक्कमेवर ६४० रुपये हप्ता शेतकऱ्यांना भरावा लागेल. तसेच तूर पिकासाठी ४७ हजार रुपये रक्कमेवर ९४० रुपये, मूग पिकासाठी ३० हजार रुपये रक्कमेवर ४५० रुपये आणि उडीद पिकासाठी २७ हजार रुपये विमा संरक्षित रक्कमेवर ४०५ रुपये प्रति हेक्टर विमा हप्ता निश्चित करण्यात आला आहे.

या योजनेमध्ये कोणत्याही प्रकारचा अवैध किंवा बोगस पीक विमा घेण्याचा प्रयत्न केल्यास संबंधित अर्ज तात्काळ रद्द करण्यात येईल. तसेच, बोगस विमा घेतल्याचे आढळून आल्यास संबंधित खातेदाराला पुढील ५ वर्षांसाठी काळ्या यादीत टाकून त्याचा आधार क्रमांक ब्लॉक केला जाईल, तसेच त्या खातेदाराला पुढील किमान ५ वर्षांपर्यंत कृषी विभागाच्या कोणत्याही योजनेचा लाभ दिला जाणार नाही. लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी शेवटच्या टप्प्यात गर्दी किंवा घाईगडबड न करता वेळेत आपल्या अधिसूचित पिकांच्या विमा संरक्षणासाठी नजीकच्या बँकेत अथवा नागरी सुविधा केंद्रांमार्फत अर्ज सादर करावेत, असे आवाहन लातूरचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दिलीप जाधव यांनी केले आहे. या योजनेचा सविस्तर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०२६०७०३१९३८३१०००१ असा आहे.


# स्मशानभूमीसाठी गायरान जमिनी संपादित करुन सामूहिक स्मशानभूमी धोरण राबवा

## माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांची मागणी

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात स्मशानभूमीचा प्रश्न अत्यंत गंभीर झाला असून, त्याकडे शासनाने गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे. तलाव, धरणे आणि रस्त्यांसाठी ज्याप्रमाणे शासन जमिनींचे संपादन करते, त्याच धर्तीवर स्मशानभूमीसाठीही जमिनी संपादित कराव्यात आणि राज्यभर एक ठोस धोरण राबवावे, अशी मागणी राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी आज विधानसभेत केली.

विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनातील प्रश्नोत्तराच्या तासात बुधवार दि. ८ जूलै २६ रोजी माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांनी राज्यातील स्मशानभूमींच्या अपुऱ्या जागांचा प्रश्न मांडला. अनेक गावांत स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध नसल्याने ग्रामस्थांची मोठी अडचण होत आहे.

यावर उपाय म्हणून त्यांनी एक महत्त्वपूर्ण पर्याय सुचवला, जर एखाद्या गावात जागा उपलब्ध नसेल, तर आसपासच्या गावांपैकी ज्या गावात गायरान जागा उपलब्ध आहे, तिथे त्या परिसरातील गावांच्या वापरासाठी एक 'सामूहिक स्मशानभूमी' विकसित




करण्याचा पर्याय शासन विचारात घेणार का? अशी विचारणा त्यांनी केली.

**शासनाची सकारात्मक भूमिका:**

या प्रश्नाला उत्तर देताना ग्रामविकास मंत्री मा.श्री.जयकुमार गोरे यांनी आमदार देशमुखांच्या सूचनेचे स्वागत केले. स्मशानभूमीचा प्रश्न सोडवणे ही सर्वांची सामुदायिक जबाबदारी असल्याचे मान्य करत, यावर नक्कीच मार्ग काढला जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

यावेळी मंत्री गोरे म्हणाले की, गायरान जमिनी संपादित करून अनेक गावांच्या सोयीसाठी किमान एक सामुदायिक स्मशानभूमी उभारण्यासाठी शासन पुढाकार घेईल. यासाठी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना तातडीने निर्देश दिले जातील. तसेच, राज्यातील ज्या-ज्या ठिकाणी स्मशानभूमीसाठी जागेचा प्रश्न प्रलंबित आहे, त्याची माहिती मागवून तो प्रश्न निकाली काढण्यासाठी एक निश्चित धोरण शासन ठरवेल.

माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी उपस्थित केलेल्या या विषयामुळे राज्यातील ग्रामविकासाच्या दृष्टीने एक महत्त्वाच्या धोरणात्मक निर्णयाची आशा निर्माण झाली आहे.

# समता सैनिक दलाचे शिस्तबद्ध नियोजन

## महामोर्चात सुरक्षा, सेवा आणि मानवतेचा आदर्श

**लातूर/प्रतिनिधी:** अनुसूचित जातीच्या आरक्षणाच्या उपवर्गीकरणाविरोधात ६ जुलै २०२६ रोजी लातूर येथे झालेल्या ऐतिहासिक महामोर्च्यात भारतीय बौद्ध महासभेच्या समता सैनिक दलाने शिस्त, सेवा आणि सामाजिक बांधिलकीचे प्रेरणादायी दर्शन घडवले. मोर्चाच्या संपूर्ण कालावधीत दलाच्या स्वयंसेवकांनी अत्यंत जबाबदारीने सुरक्षा व्यवस्था सांभाळत सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू तथा रिपब्लिकन सेनेचे सरसेनापती आनंदराज आंबेडकर आणि युवा नेते अमन आंबेडकर लातूरमध्ये दाखल झाल्यापासून त्यांच्या आगमनापासून ते मोर्चा संपेपर्यंत समता सैनिक दलाने कडक सुरक्षा कवच उभे केले होते. प्रत्येक ठिकाणी शिस्तबद्ध पद्धतीने स्वयंसेवक तैनात राहिल्याने मोर्चा शांततेत आणि नियोजनबद्धरीत्या पार पडला.

विशेष म्हणजे, समता सैनिक दलाने केवळ सुरक्षा व्यवस्थेची जबाबदारीच पार पाडली नाही, तर मोर्चामध्ये उपस्थित महिला पत्रकार, भीमसैनिक आणि नागरिकांना मोफत पिण्याचे पाणी व बिस्किटांचे वाटप करून मानवतेचे दर्शन घडवले. उन्हाच्या तडाख्यात हजारो आंदोलकांना दिलेला हा दिलासा सर्वांकडून कौतुकाचा विषय ठरला.

शिस्त, सेवाभाव आणि सामाजिक



उत्तरदायित्व यांचा उत्कृष्ट संगम घडवून समता सैनिक दलाने मोर्चाच्या यशात मोलाचे योगदान दिले. त्यांच्या कार्यामुळे उपस्थित नागरिक, पत्रकार आणि विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी दलाच्या स्वयंसेवकांचे मनापासून अभिनंदन केले.

महामोर्चाच्या यशामागे समता सैनिक दलाच्या स्वयंसेवकांनी निस्वार्थ भावनेने केलेली सेवा आणि शिस्तबद्ध नियोजन हेच खरे वैशिष्ट्य ठरले. त्यांच्या या कार्यामुळे समाजात सेवा, समता आणि संघटनशक्तीचा प्रभावी संदेश पोहोचला असून, त्यांच्या कार्याचे जितके कौतुक करावे तितके कमीच असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## रस्त्यावर कचरा टाकणा-या वाहन चालकावर गुन्हा दाखल

**लातूर /प्रतिनिधी:** आयुक्त, राहुल कुलकर्णी व उपायुक्त, वसुधा फड यांच्या आदेशावरून, मुख्य स्वच्छता अधिकारी कलीम शेख,स्वच्छता विभाग प्रमुख रमाकांत पिडगे यांच्या सुचनेनुसार,मुख्य स्वच्छता निरीक्षक रवि कांबळे, स्वच्छता निरीक्षक शिवाजी कुटकर यांनी दादाजी कोंडदेव नगर च्या पश्रि्चमेला छोटा हत्ती मधुन कचरा टाकल्यामुळे वाहन क्र. MH-24-BW-1026 या वाहनावरील चालकावर एमआयडीसी पोलीस स्टेशनला गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

याद्वारे शहरातील नागरीकांना आवाहन करण्यात येते कि, शहर स्वच्छतेसाठी सर्वांनी सहकार्य करावे. आपल्या घरातील व दुकानातील कचरा घंटागाडीत कचरा द्यावा. रस्त्यावर किंवा उघड्या जागेत कचरा टाकू नये अन्यथा दंडात्मक कार्यवाही करुन गुन्हा दाखल करण्यात येईल.

## प्रवीण बागडे यांच्या कवितेला प्रथम क्रमांकाचा मान

### विदुमाऊली बहुउद्देशीय संस्था व काव्यसागर साहित्य मंच आयोजित राज्यस्तरीय काव्यस्पर्धेत उल्लेखनीय यश



**नागपूर/प्रतिनिधी :** सामाजिक भान जपणारे लेखक, कवी व विचारवंत प्रवीण बागडे यांच्या कवितेला विदुमाऊली बहुउद्देशीय संस्था, कनारखेड (जि. बुलढाणा) व काव्यसागर साहित्य मंच, शेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय काव्यस्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त झाला आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल त्यांना संस्थेतर्फे सन्मानपत्र प्रदान करण्यात आले.

स्पर्धेत राज्यभरातील अनेक कवींचा सहभाग असताना प्रवीण बागडे यांच्या आशयघन, सामाजिक जाणीव जागृत करणाऱ्या आणि विचारप्रवर्तक कवितेची परीक्षकांनी प्रथम क्रमांकासाठी निवड केली. हा सन्मान त्यांच्या सातत्यपूर्ण साहित्यसाधनेची आणि दर्जेदार लेखनाची पावती मानला जात आहे.

प्रवीण बागडे हे सामाजिक, राजकीय व समकालीन विषयांवर परखड लेखन करणारे लेखक म्हणून परिचित असून, त्यांच्या कविता व लेख विविध वृत्तपत्रे आणि नियतकालिकांत सातत्याने प्रकाशित होत असतात.

या यशाबद्दल साहित्य, सामाजिक, पत्रकारिता व विविध क्षेत्रांतील मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन होत आहे. हा सन्मान आगामी साहित्यनिर्मितीसाठी प्रेरणादायी ठरेल, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

## बाल निरीक्षण गृहांतील सुरक्षा रक्षकांचे मानधन उपस्थितीच्या पडताळणीनंतरच अदा- महिला व बालविकास मंत्री तटकरे

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील बाल निरीक्षण गृहांमध्ये सुरक्षा रक्षकांची एकूण २८८ पदे मंजूर असून त्यापैकी २१८ पदांवर कर्मचारी कार्यरत आहेत. या सुरक्षा रक्षकांना शासन निर्णयानुसार प्रतिमाह १८ हजार रुपये मानधन दिले जाते. त्यानुसार दरमहा सुमारे ३९ लाख २४ हजार रुपयांचे मानधन अदा करण्यात येत असल्याची माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली.

विधानसभा सदस्य डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी याबाबत प्रश्न विचारला असता, मंत्री तटकरे म्हणाल्या की, सुरक्षा रक्षकांचे मानधन अदा करण्यापूर्वी संबंधित निरीक्षण गृहाच्या अधीक्षकांकडून सुरक्षा रक्षकांच्या उपस्थितीचे प्रमाणपत्र तयार केले जाते. त्यावर जिल्हा महिला व बालविकास अधिकाऱ्यांची स्वाक्षरी घेऊन ते आयुक्त कार्यालयाकडे सादर करण्यात येते. उपस्थितीची खातरजमा झाल्यानंतरच संबंधित सुरक्षा रक्षकांचे मानधन वितरित केले जाते.सुरक्षा रक्षक हे प्रतिमाह १८ हजार रुपये मानधन दरात उपलब्ध होण्यास किंवा कार्य करण्यास इच्छुक नसल्यास पर्यायी व्यवस्था म्हणून बाह्य यंत्रणेमार्फत सुरक्षा सेवा उपलब्ध करून देण्यात येत असल्याचेही मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले.

## संपादकीय...


### तर नाटो आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम होईल.

नाटोची तुर्कियेमध्ये आज आणि उद्या होणारी वार्षिक परिषद पाश्र्चात्त्य सुरक्षा व्यवस्थेची आणि अमेरिकन नेतृत्वाची महत्त्वाची कसोटी आहे. अमेरिकेच्या २५० व्या स्वातंत्र्य वर्धापनदिनाचा जल्लोष संपल्यानंतर राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे लक्ष पुन्हा जागतिक राजकारणाकडे वळले आहे. तुर्कियेमध्ये होणारी नाटोची शिखर परिषद ही केवळ आणखी एक वार्षिक बैठक नाही. उलट दुसऱ्या महायुद्धानंतर निर्माण झालेल्या पाश्र्चात्त्य सुरक्षा व्यवस्थेची आणि अमेरिकेच्या नेतृत्वाची ही महत्त्वाची कसोटी आहे. या परिषदेत चर्चेचा केंद्रबिंदू रशिया, युक्रेन किंवा मध्यपूर्वेतील संघर्ष नसून स्वतः डोनाल्ड ट्रम्प असतील, हेच या बैठकीचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. सात दशकांहून अधिक काळ नाटो (नॉर्थ अटलांटिक ट्रीटी ऑर्गनायझेशन) ही अमेरिकेच्या जागतिक नेतृत्वाची सर्वात प्रभावी संस्था राहिली. युरोपच्या सुरक्षेची अंतिम हमी अमेरिका देईल, या गृहितकावर संपूर्ण व्यवस्था उभी आहे; परंतु ट्रम्प यांनी या गृहितकाबाबतच आव्हान उभे केले आहे. त्यांच्या मते, अमेरिकेने अब्जावधी डॉलर्स खर्च करून युरोपचे संरक्षण करावे आणि युरोपीय देशांनी त्याचा लाभ घ्यावा, ही व्यवस्था अन्यायकारक आहे. त्यामुळे त्यांच्या 'अमेरिका फर्स्ट' धोरणामुळे नाटोच्या कार्यपद्धतीत मूलभूत बदल घडू लागले आहेत. ट्रम्प यांच्यावर अनेकदा नाटोविरोधी असल्याचा आरोप केला जातो. प्रत्यक्षात ते नाटोचे विरोधक नाहीत; मात्र ते नाटोच्या जुन्या आर्थिक मॉडेलचे विरोधक आहेत. त्यांना अमेरिकेची सुरक्षा महत्त्वाची वाटते; पण त्यासाठी अमेरिकेनेच सर्वाधिक किंमत मोजावी, हे त्यांना मान्य नाही. त्यामुळे संरक्षण खर्च वाढविण्याची त्यांची मागणी केवळ राजकीय घोषणाबाजी नसून अमेरिकेच्या आर्थिक आणि सामरिक हिताशी जोडलेली आहे. विशेष म्हणजे, ट्रम्प यांच्या सततच्या दबावाचा परिणामही दिसू लागला आहे. रशियाने युक्रेनवर आक्रमण केल्यानंतर जर्मनीसारख्या देशांनी संरक्षण खर्चात ऐतिहासिक वाढ केली. पोलंड, फिनलंड आणि बाल्टिक देशांनी आधुनिक शस्त्रास्त्रांची मोठ्या प्रमाणावर खरेदी सुरू केली. गेल्या वर्षभरात युरोप आणि कॅनडाने संरक्षणासाठी केलेली अतिरिक्त शेकडो अब्ज डॉलर्सची गुंतवणूक ही मोठ्या प्रमाणात ट्रम्प यांच्या दबावाचेच फलित मानली जाते. मात्र, याच ठिकाणी दुसरा प्रश्र्न निर्माण होतो की, युरोप संरक्षणाच्या बाबतीत अधिक स्वावलंबी झाला, तर अमेरिकेचे नेतृत्व पूर्वीसारखे प्रभावी राहील का? फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी काही वर्षांपूर्वी 'युरोपियन स्ट्रॅटेजिक ऑटोनॉमी'ची संकल्पना मांडली होती. त्यावेळी अनेकांनी तिच्याकडे दुर्लक्ष केले; पण आज स्थिती बदलली आहे. जर्मनी, फ्रान्स आणि इतर देश आता अमेरिकेवरील अवलंबित्व कमी करण्याबाबत गंभीर झाले आहेत. त्यामुळे ट्रम्प यांचे धोरण नाटो मजबूत करत आहे की, युरोपला अमेरिकेपासून अधिक स्वतंत्र बनवत आहे, हा महत्त्वाचा प्रश्र्न आहे. या परिषदेत युक्रेन युद्धाचा मुद्दाही महत्त्वाचा असला, तरी तो यापूर्वीच्या परिषदांइतका केंद्रस्थानी राहणार नाही. ट्रम्प प्रशासनाचे लक्ष सध्या इराण, मध्यपूर्व आणि चीनकडे अधिक केंद्रित आहे. अमेरिकेच्या धोरणात हा मोठा बदल मानला जात आहे. ट्रम्प यांच्या दृष्टीने चीन हे दीर्घकालीन सामरिक आव्हान आहे, तर रशिया हा प्रादेशिक प्रतिस्पर्धी आहे. त्यामुळे युरोपने स्वतःच्या सुरक्षेची अधिक जबाबदारी घ्यावी, अशी त्यांची अपेक्षा आहे. चीनचा वाढता प्रभाव हा नाटोसाठीही चिंतेचा विषय बनला आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, सायबर सुरक्षा, उपग्रह प्रणाली, दुर्मीळ खनिजे आणि इंडो-पॅसिफिकमधील सामरिक स्पर्धा या नव्या आव्हानांमुळे नाटोची भूमिका युरोपपुरती मर्यादित राहिलेली नाही. भविष्यात नाटोला पारंपरिक युद्धाबरोबरच तांत्रिक, आर्थिक आणि सायबर सुरक्षेच्या नव्या स्वरूपालाही सामोरे जावे लागणार आहे. तुर्किये या परिषदेचे यजमानपद भूषवत असल्यालाही विशेष महत्त्व आहे. एकीकडे तुर्किये नाटोचा सदस्य आहे, तर दुसरीकडे रशिया, मध्यपूर्व आणि इस्लामी जगाशीही त्याचे जवळचे संबंध आहेत. राष्ट्राध्यक्ष रेचेप तय्यीप एर्दोगान आणि ट्रम्प यांच्यातील वैयक्तिक संबंध तुलनेने चांगले असल्यामुळे अनेक संवेदनशील विषयांवर संवादाचा मार्ग खुला राहण्याची शक्यता आहे. ट्रम्प यांच्या व्यक्तिमत्त्वाचाही या परिषदेवर मोठा प्रभाव राहणार आहे. ते पारंपरिक राजनैतिक भाषेपेक्षा थेट संवाद आणि सार्वजनिक दबावाचे राजकारण करतात. त्यामुळे त्यांच्या प्रत्येक वक्तव्याकडे शेअर बाजार, ऊर्जा बाजार, संरक्षण उद्योग आणि जागतिक राजकारण लक्ष ठेवून असते. एका पत्रकार परिषदेत केलेले त्यांचे एखादे विधानही अनेक देशांच्या धोरणांवर परिणाम करू शकते. या परिषदेचा आणखी एक महत्त्वाचा संदेश म्हणजे, अमेरिकेची जागतिक भूमिका बदलत असली, तरी ती संपत नाही. अमेरिका नाटो सोडण्याच्या मनःस्थितीत नसली, तरी ती आता 'अमर्याद सुरक्षा हमी' देण्यास तयार नाही. त्याऐवजी 'ज्यांनी अधिक योगदान दिले, त्यांनाच अधिक सहकार्य' हा दृष्टिकोन स्पष्टपणे दिसत आहे. त्यामुळे पुढील दशकात नाटो अधिक समसमान आर्थिक सहभागावर आधारित संघटना बनण्याची शक्यता आहे. परिषदेत सहभागी होणाऱ्या नाटो सदस्य देशांसमोर ट्रम्प यांची नाराजी रोखण्याचे मोठे आव्हान आहे. युरोपीय देश अमेरिकेच्या नाटोवरील संरक्षण खर्चाचा अनुचित फायदा घेत आहेत, असा त्यांचा आरोप आहे. ट्रम्प आणि युरोपीय देशांतील मतभेद वाढत चालले आहेत. जानेवारीमध्ये ग्रीनलँड ताब्यात घेण्याची धमकी, इराणवरील हल्ल्यानंतर ऊर्जा दरांमध्ये झालेली वाढ, तसेच अमेरिकेच्या लष्करी मोहिमांना युरोपने पुरेशी मदत न करणे इत्यादी कारणांमुळे युरोपमध्ये ट्रम्प यांची लोकप्रियता घसरली आहे. बुधवारी सकाळी मुख्य परिषद होणार असून, संभाव्य वाद टाळण्यासाठी तिचा कालावधी मुद्दाम कमी ठेवला आहे. परिषदेनंतर ट्रम्प युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की आणि सीरियाचे राष्ट्राध्यक्ष अहमद अल-शारा यांची स्वतंत्र भेट घेणार आहेत. त्यानंतर पत्रकार परिषद घेऊन ते वॉशिंग्टनला रवाना होतील. ट्रम्प २०१८ प्रमाणे नाटोमधून बाहेर पडण्याची धमकी देतील, याची शक्यता कमी वाटते; मात्र ट्रम्प कोणत्याही क्षणी अनपेक्षित भूमिका घेऊ शकतात. तुर्कियेत पोहोचल्यावर त्यांचा मूड कसा असेल, यावर अनेक गोष्टी अवलंबून असतील. गेल्या महिन्यात नाटोचे सरचिटणीस मार्क रूट यांनी व्हाईट हाऊसमध्ये ट्रम्प यांची भेट घेतली होती. त्या वेळी त्यांनी ट्रम्प यांच्या नेतृत्वाचे कौतुक करत 'ट्रम्प ट्रिलियन' या नावाने सादरीकरण केले होते. 'द आर्ट ऑफ द डील' शैलीतील सुवर्ण अक्षरांच्या पोस्टरद्वारे गेल्या दशकात युरोपने संरक्षण खर्चात केलेल्या वाढीची माहिती त्यांनी दिली होती. मित्रदेशांकडून आपल्याला नेमके काय अपेक्षित आहे, असे विचारले असता ट्रम्प यांनी, 'मला फक्त त्यांची निष्ठा हवी आहे,' असे उत्तर दिले. एकंदरीत, तुर्कियेतील ही परिषद नाटोच्या इतिहासातील आणखी एक नियमित बैठक नाही. ती पाश्र्चात्त्य जगातील बदलत्या नेतृत्वाची, युरोपच्या वाढत्या स्वायत्ततेची आणि अमेरिकेच्या नव्या जागतिक दृष्टिकोनाची दिशा ठरविणारी परिषद ठरू शकते. ट्रम्प यांची भूमिका यशस्वी झाली, तर नाटो आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम होईल.

# उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांची जिल्हा नियंत्रण कक्षास भेट

## आपत्तीच्या काळात परिस्थितीचे गांभीर्य विचारात घेता तात्काळ उपाययोजना राबवण्याचे निर्देश

## आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास तात्काळ प्रशासनाशी संपर्क साधावा-उपमुख्यमंत्री



**पुणे/प्रतिनिधी** :राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आज पुणे जिल्हाधिकारी कार्यालय येथील जिल्हा नियंत्रण कक्षास भेट देऊन पावसामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा आढावा घेतला. आपत्तीच्या काळात परिस्थितीचे गांभीर्य विचारात घेता तात्काळ उपाययोजना राबविण्याचे निर्देश दिले. तसेच आपत्तीच्या काळात शासन आणि जिल्हाप्रशासन नागरिकांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे. त्यामुळे नागरिकांनी अफवावर विश्र्वास ठेवू नये, प्रशासनाच्यावतीने देण्यात येणाऱ्या सूचनांचे पालन करावे, आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास तात्काळ प्रशासनाशी संपर्क साधावा, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी आमदार चेतन तुपे, जिल्हा परिषद अध्यक्ष विरधवल जगदाळे, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम, पाटबंधारे विभागाचे अधीक्षक अभियंता, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी विठ्ठल बनोटे आदी उपस्थित होते.

श्रीमती पवार म्हणाल्या, भारतीय हवामान विभागाने ४, ५ आणि ६ जुलै २०२६ करिता पुणे जिल्ह्याकरिता रेड अलर्ट दिलेला होता. या काळात ५ जुलै रोजी ४६.९ मि. मी., ६ जुलै रोजी ५९ मि. मी. इतका पाऊस झालेला आहे. त्याचबरोबर ५ व ६ जुलै रोजी एकूण १५८ मंडलापैकी २७ मंडलामध्ये ६५ मि.मी. पेक्षा जास्त पाऊस पडलेला आहे. एकूण जिल्ह्यात २ एनडीआरएफ पथक, ४ पीएमआरडीए पथक, ३०० स्थानिक आपदामित्र, ५ स्थानिक संस्था आदी मदत व बचाव कार्यासाठी कार्यरत यंत्रणा आहेत. तसेच राज्य आपत्ती व्यवस्थापन कक्ष, जिल्हा व्यवस्थापन कक्ष, महानगरपालिका, पीएमआरडीए, पोलिस व सर्व शासकीय यंत्रणा यांचे मध्ये समन्वय असून आवश्यक ते सर्व मदतकार्य करत आहे. एकूण ५६८ व्यक्तींना बचावकार्य करुन सुरक्षितरित्या बाहेर काढण्यात आले आहेत. एकूण ९ ठिकाणी छोट्या दरडी कोसळल्या आहेत. ९ ठिकाणी रस्ते बंद करण्यात आले आहेत.

मावळ तालुक्यातील ताजे येथील २५० नागरिकांना आणि मौजे भावडी, कदमवस्ती २७, वडगाव शिंदे ८, तळेगाव दाभाडे ४० ते ५०, घोर वाडी ३०, आंबेठाण, चाकण ८०, सक्सेस पॉइंट सूंबरे नगर २०, लोणावळा १०० ते ११० आणि मौजे पेठ येथील ८ नागरिकांना सुरक्षितस्थळी स्थलांतरित करण्यात आले आहे.

जिल्ह्यात घाट माथा परिसरात ऑरेंज अलर्ट देण्यात आला असून जुन्नर, आंबेगाव, खेड, मावळ, मुळशी, राजगड व भोर तालुक्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. मावळ तालुक्यातील मौजे लोणावळा परिसरात भाजे धबधबा. लोहगड किल्ला, विसापूर किल्ला, तिकोणा किल्ला, तुंग किल्ला, टायगर पॉईट, लायन्स पॉईट पवना डॅम या ठिकाणी ३१ ऑगस्टपर्यंत भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ लागू करण्यात आले आहे.

इंदायणी नदीमध्ये 'फ्री कॅचमेंट' मुळे पाण्याचा प्रवाह वाढत असून उद्या श्री. क्षेत्र देहू आणि परवा श्री. क्षेत्र आळंदी येथून पालखी प्रस्थान सोहळा असल्याने वारकऱ्यांना क्षेत्र देहू व श्री. क्षेत्र आळंदी येथे न येता पुणे महानगरपालिका हद्दीत पालखीने प्रवेश केल्यानंतर पालखी सोहळ्यात सहभागी व्हावे, आपली पुणे महानगर पालिकेच्याशाळेत व्यवस्था करण्याचे निर्देश देण्यात आले आहे.

जिल्ह्यातील जाधववाडी धरण आणि टाटा धरण, लोणावळा १०० टक्के, खडकवासला धरण २०.३० टक्के, वरसगाव धरण २९.६ टक्के, पानशेत धरण ३१.५१ टक्के, टेमघर धरण १४.९९ टक्के, मुळशी धरण ३२.१३ टक्के आणि पवना धरण ४८.७५ टक्के पाणी साठा आहे, अशी माहिती श्रीमती पवार यांनी दिली.

श्री. डुडी यांनी जिल्ह्यातील परिस्थितीच्या आढावा दिला. जिल्ह्यातील मयत नागरिकांच्या वारसांना ४ लाख रुपयांची मदत करण्याच्या सूचना श्रीमती पवार यांनी दिल्या.

# डहाणू-जव्हार आगाराला महिन्याभरात 30 नवीन बसेस- परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

**मुंबई/प्रतिनिधी :** पालघर जिल्ह्यातील डहाणू व जव्हार आगारास महिन्याभरात ३० नवीन बसेस उपलब्ध करून देण्यात येतील. तसेच आवश्यकतेनुसार भविष्यात आणखी बसेसही उपलब्ध करून दिल्या जातील, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विधानपरिषदेत दिली.

विधानपरिषदेत सदस्य निरंजन डावखरे यांनी डहाणू व जव्हार आगारासाठी सुस्थितीतील बसेस उपलब्ध करून देण्याबाबत, तर सदस्य प्रवीण दरेकर यांनी राज्यातील एसटी बस अपघातांमध्ये वाढ झाल्याबाबत प्रश्न उपस्थित केला होता. या चर्चेत सदस्य प्रवीण दरेकर, बच्चू कडू व अनिकेत तटकरे यांनी सहभाग घेतला.

परिवहन मंत्री सरनाईक म्हणाले की, दुर्गम, आदिवासी डोंगराळ भागातही एसटी सेवा पोहोचविण्याचे शासनाचे धोरण असून, या भागांमध्ये अखंड सेवा देण्यासाठी बस ताफ्याचे आधुनिकीकरण सुरू आहे. मागील सात-आठ वर्षांत नवीन बसेसची खरेदी कमी झाली होती. इलेक्ट्रिक बस उपलब्ध होण्यात विलंब झाल्याने शासनाने पुन्हा डिझेल बसेस खरेदीचा निर्णय घेतला. आतापर्यंत २,६४० डिझेल बसेस खरेदी करण्यात आल्या असून टप्प्याटप्प्याने एकूण ८,३०० नवीन बसेस ताफ्यात दाखल करण्यात येत आहेत.मंत्री सरनाईक म्हणाले की, १५ वर्षांपर्यंत बस वापरण्याची मर्यादा असल्याने जुन्या बसेसमुळे विशेषतः ग्रामीण व दुर्गम भागात बिघाडाचे प्रमाण वाढले होते. मात्र तांत्रिक कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याऐवजी त्यांच्याकडून अधिक परिणामकारक काम करून घेण्यावर भर देण्यात येणार आहे. राज्यातील बस अपघातांबाबत माहिती देताना मंत्री सरनाईक यांनी सांगितले की, अपघात रोखण्यासाठी नवीन चालकांना ४८ ते ८० दिवसांचे प्रशिक्षण, सुरक्षित वाहनचालकतेचे विशेष प्रशिक्षण, सिम्युलेटरद्वारे प्रशिक्षण, नियमित दृष्टी तपासणी, अल्कोहोल चाचणी, तसेच सेवाकालानुसार उजळणी प्रशिक्षण देण्यात येत आहे.

मंत्री सरनाईक म्हणाले की, भविष्यात बसचे आयुष्य १५ वर्षांऐवजी ८ वर्षांपर्यंत मर्यादित ठेवून टप्प्याटप्प्याने इलेक्ट्रिक बसकडे संक्रमण करण्याचे धोरण शासनाने स्वीकारले आहे. डोंगराळ व दुर्गम भागात मोठ्या बसेस पोहोचू शकत नसल्याने राज्यासाठी २०० मिनी बसेस उपलब्ध करण्यात येत असून त्या पुढील दोन महिन्यांत सेवेत दाखल होतील. या बसेस व्यावसायिक नफ्यापेक्षा दुर्गम भागातील शेतकरी, आदिवासी, दिव्यांग आणि सर्वसामान्य नागरिकांना सेवा देण्याच्या उद्देशाने चालविण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

एसटीच्या नव्याने विकसित होणाऱ्या बस पोर्टमध्ये दिव्यांगांसाठी काही जागा राखीव ठेवण्याच्या प्रस्तावाचाही सकारात्मक विचार करण्यात येईल, असे मंत्री सरनाईक यांनी या प्रश्नाच्या उत्तरात सांगितले.

# जायकवाडी प्रकल्पातील पुनर्वसित गावांचे तातडीने सर्व्हेक्षण करा - जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील



**मुंबई/प्रतिनिधी :** जायकवाडी प्रकल्पातील पुनर्वसित गावांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी महसूल आणि जलसंपदा विभागाने एकत्रित सर्व्हेक्षण करून एक महिन्यात प्रस्ताव सादर करण्याचा सूचना जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या.

जायकवाडी प्रकल्पात पुनर्वसित झालेल्या शेवगाव नेवासा आणि गंगापूर तालुक्यातील गावांच्या समस्याबद्दल मंत्रालयात मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत बैठक झाली. बैठकीला मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील, आ. मोनिका राजळे, आ. रमेश बोरनारे, आ. विठ्ठलराव लंघे, आ. अक्षय कर्डीले जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, दूरदृष्य प्रणालीद्वारे जिल्हाधिकारी डॉ पंकज आशिया यांच्यासह जलसंपदा आणि मदत व पुनर्वसन विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या वेळी मंत्री विखे-पाटील म्हणाले, पुनर्वसित गावात बुडीत क्षेत्र किती आहे. असलेल्या किती जमिनीमध्ये पाणी जाते याबाबतचा ड्रोण सर्व्हे करून घेण्याचे सूचित करून, जलसंपदा व महसूल विभागाने गावांमध्ये जनसुनावणी घेवून ज्यांच्या जमीनी आहेत त्या शेतकऱ्यांची माहिती महिनाभरात संकलित करून त्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठवावा. जमीन अदलाबदल, भोगावटा वर्ग एक करणे, तसेच पुनर्वसित गावात नसलेल्या सुविधांचा आढावा जिल्हाधिकारी यांनी घ्यावा यासंदर्भात स्वतंत्र बैठक घेण्याचे बैठकीत निश्र्चित करण्यात आले.

मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांनी जमिनीचा सर्व्हे आल्यानंतर त्या गावातील प्रश्र्नाच्या संदर्भात निर्णय करण्याची ग्वाही दिली. शेतकऱ्यांच्या समस्या मांडतांना आ. मोनिका राजळे यांनी जायकवाडी प्रकल्प आधी झाला. त्यानंतर झालेल्या कायद्यामुळे शेतकऱ्यांची मोठी समस्या निर्माण झाल्याचे सांगितले.

आ. विठ्ठलराव लंघे यांनी पुनर्वसित गावांच्या समस्या मोठ्या प्रमाणात आहेत. या गावांना न्याय मिळेल असे निर्णय व्हावेत अशी अपेक्षा व्यक्त केली.

# राज्यातील भ्रष्टाचारावर नियंत्रण ठेवण्यासाठी श्री तुकाराम मुंढे यांना राज्याच्या प्रशासकीय अधिकारी (मुख्य सचिव) पदावर नियुक्ती करण्यात यावी

राज्यात अनेक खात्यांमध्ये किंवा विभागांमध्ये भ्रष्टाचाराची दुर्गंधी दिवसेंदिवस पसरत आहे.या अनुषंगाने यावर नियंत्रण ठेवणे अत्यंत गरजेचे आहे.अन्यथा भ्रष्टाचार राज्याला पोखरून टाकेल.राज्यासह देशाला कल्पना आहे की, माननीय श्री तुकाराम मुंढेनी ज्या-ज्या विभागांचा पदभार सांभाळला किंवा स्विकारला अशा सर्वच विभागांच्या संबंधित नागरिकांनी श्री तुकाराम मुंढे यांचे कौतुक करून स्वागत केले आहे.



कारण त्यांची कार्यपद्धती व कार्य करण्याची शैलीमुळे संबंधित विभाग घाबरायला लागला आहे आणि याचा सरळ फायदा राज्याच्या १४ कोटी जनतेला होत आहे,ही अत्यंत लाख मोलाची कामगिरी आज आपल्या अधिकाराचा वापर करून मुंढे करीत आहे.त्यामुळे सन्माननीय तुकाराम मुंढे यांना माझा सलाम.आपणा सर्वांनाच ग्यात असेल की, तुकाराम मुंढे यांनी आपल्या अधिकाराचे तंतोतंत पालन करून कोणाच्याही दबावाखाली न येता कठोर कारवाईचा पवित्रा घेतला.

परंतु कठोर कारवाईचे सुत्र राजकीय पुढाऱ्यांना पचले नाही आणि सरकारने त्यांची २५ वेळा वेगवेगळ्या विभागात बदली केल्याचे आपण पहिले.परंतु आता बदली तंत्र बदलवून केंद्र सरकारने त्यांची जर राज्याच्या मुख्य सचिवपदी नियुक्ती केली तर सर्वच अडचणी आपोआप दूर होतील व महाराष्ट्र भ्रष्टाचार मुक्त होऊन सुजलाम सुफलाम होण्यास मोठी मदत होईल.

असे सांगितले जाते की, महाराष्ट्र राज्याचा कारभार पहाण्यासाठी राज्यात प्रत्येक विभागात महत्वपूर्ण प्रशासकीय अधिकारी आहेत व त्यांचे संपूर्ण नियंत्रण त्यांच्या विभागांवर असते.अशा पध्दतीचे राज्यात ३५० पेक्षा जास्त आयएएस अधिकारी आहेत आणि त्यांनी केलेली कोणतीही कायदेशीर कारवाई म्हणजे लक्ष्मण रेषा असते यात कोणत्याही प्रकारची हयगय केल्या जात नाही व कोणाचाही हस्तक्षेप ग्राह्य धरल्या जात नाही.परंतु दुर्दैवाने सांगावे लागते की,यात फक्त एकच अधिकारी तुकाराम मुंढे एक्शनमोडमध्ये असल्याचे दिसून येते आणि ते ज्या-ज्या विभागात गेले त्या-त्या संपूर्ण विभागाची पोलखोल करून आणि योग्य कारवाई करून संपूर्ण जनतेपुढे ठेवली आहे त्यामुळेच आज तुकाराम मुंढे एक प्रचलित व्यक्तीमत्व दिसून येते.त्यामुळे प्रश्र्न उपस्थित होतो की, राज्याच्या चांगल्या कामासाठी फक्त एकच अधिकारी लढतो की काय असे चित्र राज्यापुढे दिसत आहे. राज्याच्या १४ कोटी जनतेला कल्पना आहे की, राज्यात वेगवेगळ्या विभागात वेगवेगळ्या पध्दतीचा भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात उफाळला आहे आणि त्यावर नियंत्रण फक्त मुख्य प्रशासकीय अधिकारी (आयुक्त) (आयएएस) अधिकारीच ठेवू शकतो.

कारण त्यांच्या कारवाईत कोणीही हस्तक्षेप करूनच शकत नाही.प्रशासकिय अधिकारी हा राजकीय पुढारी, आमदार-खासदार, संबंधित विभागाचे मंत्री किंवा अधिकारी यांच्या चुकीच्या धोरणाच्या विरूद्ध सरळ कारवाई करण्याचा पुर्ण अधिकार असतो आणि तेच काम श्री तुकाराम मुंढे इमानदारीने आणि कसोटीने करीत आहे.त्यामुळे प्रश्र्न निर्माण होतो की, राज्याच्या संबंधित विभागाच्या प्रशासकीय अधिकारी पदावर असणारे आय एएस अधिकारी ३५० पेक्षा जास्त आहेत त्यांनी तुकाराम मुंढे यांच्या कारवाईपासुन काहीतरी शिकवण घेतली पाहिजे किंवा त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून काम करायला पाहिजे.

कारण राज्यातील सर्वच विभाग दुधासारखे शुद्ध नाहीत ही बाब हमखासपणे सर्वांनाच ग्यात आहे. त्यामुळे प्रश्र्न उपस्थित होतो की, राज्याचा एकच अधिकारी ज्या-ज्या विभागात जातो त्या त्या ठिकाणी त्याला सर्वत्र काळाबाजार दिसतो आणि बाकिच्या अधिकाऱ्यांना काहीच का दिसत नाही?याचाच अर्थ असा की, पाणी कुठेतरी मुरत असावे. त्यामुळे महामहीम राष्ट्रपती, पंतप्रधान व केंद्र सरकारला विनंती आहे की, तुकाराम मुंढे यांची जनहितार्थ धडक कारवाई लक्षात घेता राज्याच्या मुख्य प्रशासकीय अधिकारपदी (मुख्य सचिवपदी) निवड करण्यात यावी.



कारण तुकाराम मुंढे यांनी सुरू केलेली धडक कारवाई वरून लक्षात येते की, राज्यात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार उफाळला आहे आणि यांवर नियंत्रण आणण्यासाठी सन्माननीय तुकाराम मुंढे यांची राज्याच्या प्रशासकीय अधिकारी(मुख्य सचिव)पदावर नियुक्ती करण्यात यावी. यामुळे सर्वच विभागांवर तुकाराम मुंढे यांची करडी नजर राहील व राज्याच्या १४ कोटी जनतेला भ्रष्टाचारापासुन मुक्ती मिळेल व मोकळा श्र्वास घेण्याचा अधिकार प्राप्त होईल. कारण ज्या-ज्या क्षेत्रात किंवा विभागात तुकाराम मुंढे यांनी पाय रोवले त्या-त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार दिसून आला आणि यावर कठोर पाऊल उचलून कारवाई फत्ते करून जनतेला आश्र्वस्त केले आणि आताही कठोर कारवाई सुरूच आहे. जय हिंद!

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
( स्वतंत्र पत्रकार )
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# भा.बौ. महासभा नवी मुंबई जिल्हा शाखेच्या वतीने पहिल्यांदाच पालि भाषा धम्म प्रशिक्षण शिबीर संपन्न

**नवी मुंबई / के. एच. हनवते :–** भारतीय बौद्ध महासभा नवी मुंबई जिल्हा शाखेच्या वतीने नवी मुंबई जिल्ह्याचे अध्यक्ष : विजय झनके गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि संस्कार विभागाच्या अधिपत्त्याखाली संस्कार विभागाचे उपाध्यक्ष : प्रकाश भालेराव गुरुजी यांच्या अध्यक्षतेखाली पालि भाषा धम्म प्रशिक्षण शिबीर रविवार दिनांक ०५/ ०७/ २०२६ रोजी सकाळी ठिक १० वाजता सुर्यपुत्र भय्यासाहेब आंबेडकर भवन पंचशील बुद्ध विहार तुर्भे स्टोअर नवी मुंबई येथे यशस्वीरित्या घेण्यात आले, नवी मुंबईत मुसळधार पाऊस असतांना देखील सुंदररित्या हे शिबीर खेळीमेळीच्या वातावरणात शिस्तबद्ध पद्धतीने संपन्न झाले. सर्वप्रथम आदर्शाची पुजा करण्यात आली. सामुहिक त्रिसरण पंचशील घेण्यात आले.

पाली भाषा प्रास्ताविकेचे वाचन कविताताई कांबळे, राजश्रीताई पारधे, सुरेखाताई सावंत, कल्पनाताई कांबळे, मनिषाताई गंगावणे यांनी केले. पाली भाषा



धम्म प्रशिक्षण शिबीराचे उद्घाटन स्वातीताई गायकवाड ( केंद्रिय शिक्षिका ) संस्कार उपाध्यक्ष - महाराष्ट्र राज्य महिला शाखा तद्वतच संचालिका - धम्मलिपी प्रचार व प्रसार समिती केंद्रिय प्रशिक्षण विभाग यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी शिबीरार्थींचा परिचय करून घेतला. तद्नंतर पालीमधील अचुक उच्चारण व उच्चारणांचा सराव,पाली भाषेतील नाम सर्वनाम लिंग काळ वचन अर्थात पाली भाषेचे मुलभुत व्याकरण वाचनात येणाऱ्या अडचणी शंका निरसन व बौध्दीक चाचणी परीक्षा या विषयावर खुपच चांगले प्रभावशाली मार्गदर्शन करून शिबीरार्थींमध्ये उर्जा निर्माण केली आणि त्याचप्रमाणे प्रामुख्याने उपस्थित मार्गदर्शक आदरणीय प्रा. सतीश पवार सर - संचालक पालि भाषा केंद्रिय प्रशिक्षण विभाग यांनी पाली भाषेचे महत्वाचे स्थान रोजच्या वापरातील शब्द धम्मपद महत्वाचे शब्द व सोपी वाक्यरचना या विषयांवर मुद्देसुद मार्गदर्शन केले.

जास्तीत जास्त उपासक व उपासिकांनी पाली विषयामध्ये प्रवेश घेवुन पालीभाषेचे ज्ञान अवगत करावे असे सांगीतले फिडबॅक मनोगत व उपस्थित सर्वांचे धन्यवाद विजय झनके गुरुजी ( जिल्हाध्यक्ष ) यांनी व्यक्त केले, कार्यक्रमाचे सुत्रसंचालन जिल्हा सरचिटणीस संजय झनके गुरुजी यांनी केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रकाश भालेराव ( उपाध्यक्ष - संस्कार) यांनी आपले विचार व्यक्त करून उपस्थित सर्वांचे आभार मानले. या शिबीरच्या यशस्वीतेसाठी प्रकाश माने गुरुजी (कोषाध्यक्ष) प्रा. गौतम सोनकांबळे (हिशोब तपासणीस), दत्तात्रय हराळ गुरुजी ( कार्यालयीन सचिव ) यांनी विशेष मेहनत घेवुन चांगली सेवा केली मधुकर हिवराळे (उपाध्यक्ष - संरक्षण), विनोद पाचपिंडे (उपाध्यक्ष- पर्यटन), राजश्रीताई पारधे (सचिव - पर्यटन), दत्ताश्रेय भालेराव (सचिव- पर्यटन), दिपक कांबळे (सचिव - संरक्षण), देव प्रधान (सचिव - संस्कार), अजय माळवे (सचिव - संरक्षण), आनंदबोधी निकाळजे (संघटक), कविताताई कांबळे (संघटक), सुरेखाताई सावंत (संघटक), कल्पनाताई कांबळे (संघटक ) मनिषाताई गंगावणे (संघटक), चांदणीताई पाचपिंडे (संघटक ) दगडु कांबळे ( संघटक) यांनी उपस्थित राहुन विशेष सहकार्य केले. नवी मुंबईमध्ये मुसळधार पाऊस सुरु असतांना देखील पालि भाषेचे ज्ञान अवगत करण्यासाठी मोठ्या उत्साहाने नवी मुंबई जिल्हाअंतर्गत वार्ड शाखा पदाधिकारी, केंद्रिय शिक्षक, केंद्रिय शिक्षिका, बौध्दाचार्य, बौध्दाचार्या, समता सैनिक दलाचे सैनिक,उपासक आणि उपासिका मोठ्या संख्येने आवर्जुन उपस्थित होते. या शिबीरामध्ये ४७ शिबीरार्थींनी सहभाग घेतला .कार्यक्रमाच्या ठिकाणी महिलांनी तथागत भगवान गौतम बुध्दांच्या काळातील धम्मोपदेशाचे पालीभाषेच्या विविध पैलुंचे पाली भाषेतुन सुरेख प्रदर्शन शिबीर स्थळी लावुन त्यांचे महत्व उपस्थितांना समजावुन सांगीतले. सरणत्तय घेवुन शिबीराची सांगता करण्यात आली.

पान १ वरून...

## मुंबईतील पूरस्थितीवर कायमस्वरूपी उपाय म्हणून १३ हजार कोटींचा एकात्मिक पूर नियंत्रण आराखडा केंद्र शासनाला सादर - मुख्यमंत्री

मुंबईतील पुनर्विकासाला गती देण्यासाठी स्वयं पुनर्विकास, म्हाडामार्फत समूह पुनर्विकास, क्लस्टर विकास आणि धारावी पुनर्विकास प्रकल्प प्रभावीपणे राबविण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. स्वयं पुनर्विकासामुळे ६०० चौरस फुटांच्या घराऐवजी १,२०० ते १,४०० चौरस फुटांपर्यंतची घरे नागरिकांना उपलब्ध होत आहेत. म्हाडाच्या विविध प्रकल्पांतून एक लाख आठ हजार सदनिका उभारल्या जाणार आहेत. धारावी पुनर्विकासातून सुमारे १ लाख ६० हजार निवासी, व्यावसायिक आणि औद्योगिक घटकांचे पुनर्वसन करण्यात येणार असून पात्र सर्व रहिवाशांना धारावीमध्येच घरे उपलब्ध करून दिली जातील.

मुंबई महानगरपालिकेत डिजिटल ट्विन प्रकल्प, एआय आधारित इमारत नकाशा मंजुरी प्रणाली, ई-टीडीआर एक्सचेंज, ऑनलाइन वित्तीय व्यवस्थापन आणि नागरिकांसाठी केंद्रीकृत तक्रार निवारण प्रणाली सुरू करण्यात आली आहे. नव्या एआय प्रणालीमुळे ६० टक्के माहिती स्वयंचलितरीत्या उपलब्ध होणार असून मंजुरी प्रक्रिया अधिक वेगवान, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख होणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

२०४७ पर्यंत ८२५ अब्ज डॉलर्स जीडीपीचे उद्दिष्ट

एमएमआरच्या भविष्यातील विकासाचा आराखडा मांडताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, २०४७ पर्यंत या प्रदेशाचा जीडीपी ८२५ बिलियन डॉलर्सपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट आहे. ३० नवीन बिझनेस हब, ३० परिवहन प्रकल्प, वॉटर मेट्रो, मेट्रो जाळ्याचा विस्तार, नवीन गृहनिर्माण प्रकल्प, एज्युसिटी, तिसरी आणि चौथी मुंबई यांसारख्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांच्या माध्यमातून मुंबई महानगर प्रदेशाला जागतिक आर्थिक केंद्र म्हणून विकसित करण्यात येणार आहे.

सांस्कृतिक वारसा प्रकल्पांना प्राधान्य

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्य शासन पायाभूत सुविधांसह सांस्कृतिक वारसा प्रकल्पांनाही समान प्राधान्य देत आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या इंदू मिल आंतरराष्ट्रीय स्मारक प्रकल्पाचे काम वेगाने सुरू असून ते निर्धारित वेळेत पूर्ण करण्यासाठी विशेष प्रयत्न सुरू आहेत. तसेच हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या तंत्रज्ञानाधारित अत्याधुनिक स्मारकाचे काम जानेवारी २०२७ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मुंबई महानगर प्रदेश हा महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाचा प्रमुख आधार असून सध्या सुरू असलेल्या आणि पुढील तीन वर्षांत विविध टप्प्यांत पूर्ण होणाऱ्या प्रकल्पांची एकूण किंमत १२ लाख २६ हजार ७०७ कोटी रुपये आहे. या सर्व प्रकल्पांचे आर्थिक नियोजन पूर्ण झाले असून कर्ज परतफेडीची व्यवस्थाही करण्यात आली आहे.

कांदळवनांचे संरक्षण हे मुंबई आणि किनारपट्टीच्या पर्यावरणीय सुरक्षेसाठी अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, अतिरिक्त कांदळवन लागवडीवर शासनाने सातत्याने भर दिला आहे. केंद्र शासनाच्या २०२१ च्या आकडेवारीनुसार राज्यातील कांदळवन क्षेत्र ३०२.७० चौरस किलोमीटरवरून ३१५.०९ चौरस किलोमीटरपर्यंत वाढले असून १२.३९ चौरस किलोमीटरची वाढ नोंदविण्यात आली आहे.

विधानसभेतील चर्चेदरम्यान सदस्यांनी उपस्थित केलेल्या विविध प्रश्नांवर शासन सकारात्मक भूमिका घेत असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. फनेल झोनच्या प्रश्नावर लवकरच बैठक घेऊन निर्णय केला जाईल. पीटीएस आणि पीएपी सदनिकांच्या मागणीसंदर्भात आवश्यक निर्देश देण्यात आले आहेत. अतिरिक्त ०.५ एफएसआयला मुदतवाढ देण्याच्या मागणीचाही सकारात्मक विचार करण्यात येईल. सर्व सार्वजनिक वाहतूक सेवांसाठी सिंगल तिकीट प्रणालीच्या सूचनेवर काम सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. चिता कॅम्प-कोळीवाडा मेट्रो जोडणीसंदर्भात मेट्रो २-बीच्या विस्तारीकरणाचा सविस्तर प्रकल्प अहवाल मंजूर झाला असून पुढील कार्यवाही सुरू आहे.

मुंबई आणि एमएमआर हा महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा 'ग्रोथ इंजिन' असल्याचे सांगताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, सर्वाधिक पायाभूत सुविधा गुंतवणूक आणि परकीय थेट गुंतवणूक (एफडीआय) या भागात येत आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होत असून मुंबई देशाची फिनटेक राजधानी आणि स्टार्टअप हब म्हणून उदयास येत आहे. मुंबईबरोबरच पुणे, छत्रपती संभाजीनगर, नागपूर आणि गडचिरोली पर्यंत विकासाची गती पोहोचविण्याचे शासनाचे धोरण असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## २०३५ पर्यंत राज्यातील सर्व एसटी बसेस पूर्णतः इलेक्ट्रिक होणार- मंत्री प्रताप सरनाईक

**मुंबई/प्रतिनिधी :** पर्यावरणपूरक, आधुनिक आणि शाश्वत सार्वजनिक वाहतूक व्यवस्था उभारण्याच्या उद्देशाने राज्य परिवहन (एसटी) महामंडळाचा संपूर्ण बस ताफा २०३५ पर्यंत टप्प्याटप्प्याने इलेक्ट्रिक करण्यात येणार असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली.

याबाबत सदस्य श्रीकांत भारतीय यांनी प्रश्न उपस्थित केला. तर सदस्य परिणय फुके, सतेज पाटील, प्रविण दरेकर, भावना गवळी, निरंजन डावखरे, उमा खापरे, सदाभाऊ खोत, प्रसाद लाड, चंद्रकांत रघुवंशी यांनी उपप्रश्न उपस्थित केला.

मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, एसटी महामंडळाने ५,१५० इलेक्ट्रिक बस घेण्याचा करार केला असून, त्यापैकी ९०० हून अधिक बस महामंडळाकडे दाखल झाल्या आहेत. या बसेस यशस्वीपणे प्रवासी सेवा देत आहेत. या करारानुसार राज्यात १७२ चार्जिंग स्टेशन उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यापैकी ३९ चार्जिंग स्टेशन पूर्ण झाली असून, आणखी ४५ स्टेशन पुढील तीन महिन्यांत कार्यान्वित होतील. उर्वरित स्टेशनही लवकर पूर्ण करण्यासाठी एसटी महामंडळ संबंधित कंपनीशी समन्वय साधत आहे. एसटी स्थानकांच्या २०० मीटर परिसरात अनधिकृतपणे प्रवासी वाहतूक करणाऱ्या खासगी बसविरोधात मोठ्या प्रमाणावर कारवाई सुरू असल्याचे सांगत आतापर्यंत २०० हून अधिक खासगी बसवर दंडात्मक कारवाई करण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले. पर्यावरणपूरक सार्वजनिक वाहतुकीला चालना देण्यासाठी २०३५ पर्यंत एसटीचा संपूर्ण ताफा इलेक्ट्रिक करण्याचे उद्दिष्ट शासनाने निश्चित केले आहे. सध्या कार्यरत बससह नव्याने खरेदी होणाऱ्या बसचा समावेश या योजनेत करण्यात येणार असून, जुन्या बसचेही टप्प्याटप्प्याने इलेक्ट्रिक वाहनांमध्ये रूपांतर केले जाणार आहे. हा टप्पा पूर्ण झाल्यानंतर महाराष्ट्र हे संपूर्ण इलेक्ट्रिक एसटी ताफा असलेले देशातील पहिले राज्य ठरेल, असा विश्वास मंत्री सरनाईक यांनी व्यक्त केला.ग्रामीण, दुर्गम आणि आदिवासी भागात एसटी सेवा अधिक सक्षम करण्यासाठी पुढील तीन वर्षांचा स्वतंत्र आराखडा तयार करण्यात आला आहे. बस डेपो आणि बसपोर्टचे आधुनिकीकरण, चालक-वाहकांसाठी निवास व्यवस्था तसेच आवश्यक सुविधांसाठी सुमारे २०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असल्याची माहिती त्यांनी दिली.

## परिवर्तनवादी साहित्य चळवळीचा ऐतिहासिक टप्पा; राज्यस्तरीय साहित्य संमेलनाच्या नियोजनाला प्रारंभ

छत्रपती संभाजीनगर :

समता, स्वातंत्र्य, न्याय, बंधुता आणि प्रबोधनाच्या मूल्यांना साहित्याच्या माध्यमातून अधिक व्यापक करण्याच्या उद्देशाने निळे प्रतीक बहुउद्देशीय सेवाभावी संस्था यांच्या वतीने 'पहिले राज्यस्तरीय परिवर्तनवादी साहित्य संमेलन-२०२६' आयोजित करण्यात येत आहे. या महत्त्वाकांक्षी संमेलनाच्या आयोजनाच्या अनुषंगाने पहिली नियोजन बैठक रविवार, दि. १२ जुलै २०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता सुभेदारी गेस्ट हाऊस, छत्रपती संभाजीनगर येथे होणार आहे.

परिवर्तनवादी साहित्य प्रवाह अधिक व्यापक करण्याबरोबरच नवोदित आणि ज्येष्ठ साहित्यिक, कवी, लेखक, पत्रकार, अभ्यासक, संशोधक, सामाजिक कार्यकर्ते व विचारवंत यांना एकत्र आणून वैचारिक संवादाचे प्रभावी व्यासपीठ निर्माण करण्याचा या संमेलनामागील उद्देश आहे. संमेलनाच्या नियोजनात सर्व घटकांचा सक्रिय सहभाग राहावा, यासाठी या बैठकीत संमेलनाची रूपरेषा, विविध समित्यांची स्थापना, कार्यक्रमाचे नियोजन, स्मरणिका, प्रतिनिधी नोंदणी, आर्थिक नियोजन तसेच विविध उपक्रमांबाबत सविस्तर चर्चा करण्यात येणार आहे.

राज्यभरातील साहित्यिक, कवी, लेखक, पत्रकार, अभ्यासक, सामाजिक कार्यकर्ते, मार्गदर्शक, हितचिंतक आणि परिवर्तनवादी चळवळीतील सर्व सहप्रवाशांनी या बैठकीस उपस्थित राहून आपल्या सूचना, मार्गदर्शन आणि सहकार्य द्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

परिवर्तनाच्या विचारांना शब्दांची ताकद आणि कृतीची दिशा देण्यासाठी प्रत्येक परिवर्तनवादी व्यक्तीचा सहभाग महत्त्वाचा आहे. आपल्या उपस्थितीमुळे हे संमेलन अधिक व्यापक, वैचारिकदृष्ट्या समृद्ध आणि ऐतिहासिक ठरेल, असे आवाहन निळे प्रतीक बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष तथा पहिले राज्यस्तरीय परिवर्तनवादी साहित्य संमेलन-२०२६ चे मुख्य संयोजक रतनकुमार साळवे यांनी केले आहे.

बैठकीचा तपशील :

- दिनांक : रविवार, १२ जुलै २०२६
- वेळ : दुपारी १२.०० वाजता
- स्थळ : सुभेदारी गेस्ट हाऊस, छत्रपती संभाजीनगर

## एस. आय. आर. २०२६ विशेष सखोल मतदार पुनर्निरिक्षण अभियान मतदारांनी १०० % सहभागी व्हावे - वसुदेव गायकवाड

**केज/प्रतिनिधी :** १ जुलै ते २९ जुलै २०२६ या कालावधीत संपूर्ण महाराष्ट्रात गांव, वाडी, वस्ती, शहरे सर्वत्र एस. आय. आर २०२६ विशेष सखोल मतदार पुनर्निरीक्षण अभियान चालू आहे. या अभियानात गांवपातळीवर बी. एल. ओ ( Blo) नियुक्त केलेले आहेत. Blo यांची जबाबदारी आहे त्या त्या गांवातील प्रत्येक मतदात्यांच्या घरापर्यंत जावून फॉर्म वितरीत करणे, फॉर्म अचुक भरून घेणे, फार्मवरील माहिती `पश्रळपश करणे. तर गांव, वस्ती, वाडया, तांडे, शहरे यातील मतदारांची अर्थात नागरिकांची जबाबदारी आहे. अचुक माहिती देण्याची. जेने करून मतदान यादीत नाव कायम राहील अन्यथा नाव कमी होईल. या मोहिमेत Blo चा मुख्य रोल/ भुमिका आहे. मृत मतदार सोडून गांवातील सर्व



मतदाराच्या घरापर्यंत जाऊन फॉर्म अचुक माहिती घेवून भरून घेण्याची व माहिती online करण्याची. या अभियानाला १ उलै २ ० २६ पासून सुरुवात झालेली आहे, २९ जुलै २० २६ च्या आत विशेष सखोल मतदान पुनर्निक्षण करून माहिती अचूकपणे माहिती online करण्याची. तेव्हा मतदारांनी Blo शी संपर्क करून एस. आय. आर (SIR ) पूर्ण करून घ्यावा आपल्या गांवाला कोण Blo आहेत, त्यांचे नाव व मोबाईल नंबर घेवून संपर्क करन विशेष सखोल मतदान पुनर्निक्षण मोहिमेत सर्व मतदारांनी/ नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन आनंद ग्रामिण विकास प्रतिष्ठाण, आनंदगांव ता. केज जि. बीड व स्वानंद सार्वजानिक वाचनालय, आनंदगांव ता. केज जि. बीड चे संस्थापक अध्यक्ष, जेष्ठ समाजसेवक वसुदेव बप्पा गायकवाड यांनी महाराष्ट्रातील सर्व मतदारांना केले आहे. महाराष्ट्र राज्यातील सर्व गांवे, तालुके, जिल्हे, विभाग व राज्यातील मतदारांनी जागरूक पणे या अभियानात सहभागी होवून आपला मतदानाचा मुलभूत हक्क अबाधित ठेवावा व भारतीय नागरिकत्व सिद्ध करावे असे अवाहन वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केले आहे

## रुग्ण व नातेवाईकांची गैरसोय करणाऱ्यांवर कारवाई यंत्रणांना सौहार्दपूर्ण वर्तन करण्याचे निर्देश- वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ

**मुंबई/प्रतिनिधी :** रुग्णालयात उपचारासाठी दाखल होणाऱ्या रूग्ण व नातेवाईकांसोबत सौहार्दपूर्ण वर्तन करण्यासंदर्भात सर्व संबंधितांना निर्देशित करण्यात आले असून सर ज.जी. समुह रुग्णालयातील समाजसेवा विभागातील दोषी कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात आली असल्याची माहिती वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी विधानसभेत दिली.

विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सदस्य विलास भुमरे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री मुश्रीफ बोलत होते.

मंत्री मुश्रीफ यांनी सांगितले की, जे जे रुग्णालयातील समाजसेवा विभागातील अधिक्षक संवर्गातील कर्मचाऱ्यांबाबत संस्थेकडे तक्रार प्राप्त झाली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने संस्थास्तरावर चौकशी समिती गठीत करुन चौकशी करण्यात आली आहे. या चौकशी समितीचा अहवाल विचारात घेवून अधिष्ठाता, सर ज.जी. समुह रुग्णालय यांनी समाजसेवा अधिक्षक संवर्गातील ज्या कर्मचाऱ्यांबाबत तक्रार आहे अशा कर्मचाऱ्यांना यापुढे कर्तव्यात कसुर होणार नाही अशा सक्त सूचना दिल्या आहेत. तसेच जे कर्मचारी विनापरवानगी गैरहजर आहेत अशा कर्मचाऱ्यांची रजा विनावेतन करण्यात आलेली आहे. दोषी आढळून आलेल्या समाजसेवा अधिक्षकांपैकी २ कर्मचांऱ्यांची वैद्यकीय शिक्षण संचालनालयाच्या २६ जून २०२६ रोजीच्या आदेशान्वये अन्य ठिकाणी बदली करण्यात आली आहे. सर्व कर्मचाऱ्यांना बायोमेट्रीक उपस्थिती बंधनकारक करण्यात आली आहे. सचिव, आयुक्त यांना यंत्रणेच्या कार्यपद्धतीवर, तसेच अधिकारी-कर्मचारी यांच्या कामावर नियंत्रण ठेवण्याचे निर्देश देण्यात आले असल्याचे मंत्री मुश्रीफ यांनी सांगितले.

## केज तालुक्यातील बैठकीत S.I.R प्रकिया B.L.A निवडी व संघटना मजबूत करण्याचा शिवसैनकीचा निर्धार - जिल्हासंपर्कप्रमुख परशुराम जाधव

**केज/प्रतिनिधी :** शिवसेना पक्षप्रमुख माजी मुख्यमंत्री मा.श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे, युवासेनाप्रमुख / मा. मंत्री मा. श्री. आदित्य ठाकरे, यांच्या आदेशावरून शिवसेना नेते अंबादास दानवे, उपनेते विश्र्वनाथ नेहरूरकर, उपनेत्या मा. सुषमा ताई अंधारे यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुराम जाधव यांनी दि. ५ जुलै २०२६ ते दि. ८जुलै २०२६ तालुका निहाय शिवसेना महिला आघाडी युवा सेना महिला आघाडी अंगीकृत सेना बैठक आयोजन करण्यात आली आहे.

यामध्ये काल बुधवार दि. ८जुलै २०२६ रोजी केज तालुका शिवसेनेची शासकीय विश्रामगृह येथे बैठक संपन्न झाली. सदरील बैठकीत S.I.R, मतदार प्रक्रिया बाबत सविस्तर चर्चा करून B.L.A नियुक्ती व संघटनात्मक बांधणी



या विषयावर चर्चा करण्यात आली. तसेच बैठकीत तालुक्यातील विविध प्रश्र्ना विषयी पदाधिकाऱ्यांना सूचना देऊन वेगवेगळ्या पद्धतीने आंदोलन करण्याचे ठरविण्यात आले. बैठकीमध्ये मार्गदर्शन करताना बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुराम जाधव यांनी प्रत्येक मतदाराने जागृत राहून मत पडताळणी प्रक्रियेत सहभाग नोंद करणे B.L.A एजंटची नियुक्ती करणे आवश्यक आहे. असे पदाधिकाऱ्यांना आदेशित केले.

तसेच प्रत्येक पदाधिकाऱ्यांनी ही मोहीम राबवून नागरिकांचा सहभाग याच्यात नोंदवावे असे सांगितले तसेच तालुक्यातील रिक्त पदाधिकाऱ्यांच्या निवडी व पक्ष वाढी विषयी जे काही करता येईल ते शिवसेना युवासेना महिला आघाडी अंगीकृत संघटना पदाधिकाऱ्यांनी करून शिवसेना पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे यांचे हात बळकट करावेत. असे आवाहन केले बैठकीला मा. जिल्हाप्रमुख रत्नाकर शिंदे, तालुकाप्रमुख अशोक जाधव,जिल्हा सचिव रोहित कसबे, शहरप्रमुख तात्या रोडे, युवा सेना तालुकाप्रमुख किशोर घुले, जिल्हा सह संघटक दिलीप जाधव,उपतालुकाप्रमुख सुरज वाघमारे, तानाजी धस, उद्धव उगल बोगळे,तालुका सचिव आप्पा कांबळे,उपशहरप्रमुख पप्पू कोल्हे, पप्पू दगे, सुधीर जाधव,मारुती घावणे, राजाभाऊ मोठे, बाळासाहेब दूनघव, दिलीप खाडे, दिलीप वाघमारे, कृष्णा केदार, अंगद देशमुख,शिवसैनिक पदाधिकारी उपस्थित होते.

# उपवर्गीकरणविरोधी महामोर्चाला महिलांचा अभूतपूर्व प्रतिसाद

**लातूर/प्रतिनिधी :** ६ जुलै रोजी अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या विरोधात लातूर उपवर्गीकरण विरोधी समितीच्या वतीने काढण्यात आलेल्या ऐतिहासिक महामोर्चात महिलांचा सहभाग विशेष लक्षवेधी ठरला. हजारो महिला हातात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे छायाचित्र घेऊन मोर्चात सहभागी झाल्या होत्या.

उपवर्गीकरण रद्द झालेच पाहिजे, अनुसूचित जातींच्या आरक्षणाशी छेडछाड चालणार नाही, जय भीम, संविधानाचा विजय असो अशा घोषणांनी लातूर शहर दणाणून गेले. महिलांच्या उत्स्फूर्त आणि शिस्तबद्ध सहभागामुळे महामोर्चाला वेगळीच ऊर्जा प्राप्त झाली. युवक, ज्येष्ठ नागरिक आणि अनुसूचित जातीतील विविध समाजघटकही मोठ्या






संख्येने या आंदोलनात सहभागी झाले होते.

महामोर्चाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते यु. डी. गायकवाड यांनी केलेले प्रभावी सूत्रसंचालन. त्यांनी अत्यंत ओघवत्या, अभ्यासपूर्ण आणि समर्पक शैलीत संपूर्ण कार्यक्रमाचे संचालन केले. विविध मान्यवरांची ओळख, आंदोलनाची भूमिका आणि कार्यक्रमाचा समन्वय त्यांनी उत्कृष्टरीत्या सांभाळला. त्यांच्या सूत्रसंचालनामुळे संपूर्ण महामोर्चात शिस्त, उत्साह आणि एकसंधता कायम राहिली. लातूर उपवर्गीकरण विरोधी समितीच्या वतीने आयोजित या महामोर्चातून अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाचा निर्णय रद्द करण्याची मागणी करण्यात आली. प्रचंड जनसहभाग, महिलांची उल्लेखनीय उपस्थिती आणि शिस्तबद्ध आयोजनामुळे हा महामोर्चा लातूरच्या सामाजिक चळवळीच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण आंदोलन म्हणून ओळखला जात आहे.

## मंथन परीक्षेत कु. प्रीती प्रल्हाद चौधरी राज्यात सातवी



**मुरूड/महेंद्र आल्टे:** मंथन राज्यस्तरीय सामान्य ज्ञान परीक्षा २०२६ च्या सोलापूर, लातूर, धाराशिव विभागाचा राज्यस्तरीय व जिल्हा स्तरीय पारितोषिक वितरण समारंभ नुकताच पार पडला. यामध्ये कळंब तालुक्यातील ढोराळा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील इयत्ता पहिलीची विद्यार्थिनी कु.प्रीती प्रल्हाद चौधरी हिने राज्यात सातवे व धाराशिव जिल्ह्यात दुसरे स्थान मिळवले आहे.

या यशाबद्दल तिचा सहाय्य्क संचालक इतर मागासवर्गीय बहुजन कल्याण कार्यालयाचे अमोल टाकभाते, निरीक्षक सार्वजनिक न्याय नोंदणी कार्यालयाचे उमेश देशमुख यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. हा कार्यक्रम बार्शी येथील माऊली लॉन्स अॅन्ड मंगल कार्यालय येथे पार पडला. यावेळी मान्यवरांच्या उपस्तितीत प्रीतीला प्रशस्तीपत्र, सन्मानचिन्ह व पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी पालक राजश्री चौधरी, प्रल्हाद चौधरी यांच्यासह मान्यवर उपस्थित होते तिच्या या उल्लेखनीय यशामुळे शाळा व परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.या यशासाठी तिला मार्गदर्शन करणाऱ्या श्रीमती स्वाती कराळे यांचे विशेष कौतुक करण्यात आले. तसेच श्री. आप्पासाहेब गोरे, श्री. निशिकांत पाटील, सौ. उषाताई मुंडे, सौ. रंजना कानडे, सौ. सुवर्णा घंटे, श्री. सुनील हिंगे नूतन मुख्याध्यापक, तसेच शालेय समिती अध्यक्ष बालाजी नाईकनवरे आणि समस्त ग्रामस्थांनी कु. प्रीतीचे अभिनंदन करून तिच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

कु. प्रीतीच्या या यशामुळे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, ढोराळा यांच्या शैक्षणिक गुणवत्तेचा पुन्हा एकदा ठसा उमटला असून विद्यार्थ्यांसाठी ती प्रेरणादायी ठरली आहे.तिच्या या यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

## अनुदानित दिव्यांग शाळा, वसतिगृहे व पुनर्वसन केंद्रांच्या नूतनीकरणासाठी ६० दिवसांची मुदत - मंत्री अतुल सावे

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील अनुदानित दिव्यांग शाळा वसतिगृहे व पुनर्वसन केंद्राच्या नूतनीकरण आणि नोंदणी प्रक्रियेसाठी निश्चित कालमर्यादा लागू केली आहे. नूतनीकरणाची प्रक्रिया पोर्टलद्वारे राबविताना काही तांत्रिक अडचणी निर्माण झाल्याने ती तात्पुरती ऑफलाइन पद्धतीने सुरू करण्यात आली आहे. याबाबत संबंधित संस्थना परवानगी देण्यात आली आहे. नूतनीकरणासाठी ६० दिवसांची मुदत देण्यात आली आहे, असे मंत्री अतुल सावे यांनी विधानपरिषदेत सांगितले. राज्यातील अनुदानित दिव्यांग शाळा वसतिगृहे व पुनर्वसन केंद्राच्या नूतनीकरणाचे प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत विधानपरिषद सदस्य सुधाकर अडबाले यांनी प्रश्न मांडला. यापुढे नूतनीकरणाचे प्रस्ताव ६० दिवसांत, तर नवीन नोंदणीची प्रक्रिया ९० दिवसांत पूर्ण करण्याची कालमर्यादा निश्चित करण्यात आली असून, त्याचे पालन न झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल, असेही मंत्री सावे यांनी या प्रश्नाच्या उत्तरात सांगितले.

प्रलंबित असलेले ३० जूनपर्यंतचे वेतनही संबंधितांना अदा करण्यात आले आहे, यासंदर्भात एकूण ४४३ अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी ३६६ अर्ज निकाली काढण्यात आले आहेत. उर्वरित ७७ अर्जांवर कार्यवाही सुरू आहे. पोर्टलमधील त्रुटी पुढील एका महिन्यात दूर करण्याच्या सूचना संबंधित यंत्रणेला देण्यात आल्या असल्याचे मंत्री सावे यांनी सांगितले.

## बेकायदेशीर जमीन खरेदी व्यवहारांची राज्यव्यापी तपासणी- महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**मुंबई/प्रतिनिधी :** शेतकरी नसतानाही कृषी जमिनींची खरेदी झालेल्या प्रकरणांची राज्यव्यापी तपासणी करण्यात येणार असून यासाठी विशेष यंत्रणा उभारण्यात येत असल्याची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत दिली.

सदस्य अनुपभैय्या अग्रवाल यांनी यासंदर्भातील लक्षवेधी सूचना मांडली होती.

महसूल मंत्री बावनकुळे म्हणाले की, कूळ कायद्यातील तरतुदीनुसार कृषी जमीन खरेदी करणारी व्यक्ती शेतकरी असणे आवश्यक आहे. तथापि काही ठिकाणी या नियमांचे उल्लंघन झाल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. राज्यातील अशा प्रकरणांची तपासणी करून शेतकरी नसलेल्या व्यक्तींनी खरेदी केलेल्या जमिनींचे मॅपिंग करण्यात येणार आहे. यासाठी जमाबंदी आयुक्तांच्या माध्यमातून कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

जमीन नोंदणी प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी मुद्रांक अधिकाऱ्यांना संबंधित व्यक्तीच्या जमिनींची माहिती पडताळण्याचा अधिकार देण्यात आला असून शेतकरी पात्रतेची खातरजमा करण्यासाठी आवश्यक यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे, असे त्यांनी सांगितले.

## माजी आमदार शिवाजीराव पाटील कव्हेकर यांच्या हस्ते माजी सहकार व संसदीय कामकाज मंत्री हर्षवर्धन पाटील यांचा सत्कार

**लातूर/प्रतिनिधी :** नॅशनल फेडरेशन ऑफ को-ऑपरेटिव्ह शुगर फॅक्टरीच लिमिटेड एनएफसीएसएफ) चे अध्यक्ष, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरद पवार गट संसदीय मंडळाचे सदस्य तथा माजी सहकार व संसदीय कामकाज मंत्री हर्षवर्धन पाटील हे लातूर दौर्यावर आले असता भाजपा नेते तथा भाजपा राष्ट्रीय किसान मोर्चा गुजरात व गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांच्या मजगे नगर येथील कैलास निवासस्थानी भेट दिली असता माजी आ.कव्हेकर यांच्याहस्ते त्यांचा शाल, पुष्पगुच्छ व छत्रपती शिवराय यांनी मूर्ती देऊन सत्कार करण्यात आला.



यावेळी माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या सौभाग्यवती भाग्यश्री हर्षवर्धन पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा प्रतिभाताई पाटील कव्हेकर, नगरसेविका आदिती पाटील कव्हेकर, राजेंद्र बापू कोरडकर, तात्यासाहेब कोरडकर, सौ. कोरडकरताई, अशोक जाधव, अनिल पाटील बावडेकर, पतंजलि योग समिती महाराष्ट्र प्रभारी विष्णूजी भूतडा, माजी नगरसेवक बालाजी शेळके, एमएनएस बँकेचे प्र.कार्यकारी संचालक नितीन सराफ, व्यापारी नितीन कोरे, रज्जाक नाना अत्तरवाले, भाजपा शहर जिल्हा किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष तानाजी झुंजे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या समवेत माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांची राजकीय, सामाजिक, आध्यात्मिक व शैक्षणिक क्षेत्रावर सविस्तर चर्चा केली. यावेळी माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर साहेब आपण आपल्या आरोग्याची योग्य ती काळजी घेऊन लवकरात बरे व्हावे. अशी ईश्वरचरणी प्रार्थनाही व्यक्त केली. यावेळी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येनी उपस्थित होते.

## कृषी पायाभूत सुविधा निधी योजनेबाबत १० जुलै रोजी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी :** भारत सरकारच्या कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयामार्फत देशभरात १९ जून २०२६ ते २० जुलै २०२६ या कालावधीत 'कृषी पायाभूत सुविधा निधी' योजनेची विशेष अंमलबजावणी मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत लातूर जिल्ह्यातील पात्र शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपन्या आणि कृषी उद्योजकांनी कृषी क्षेत्रात पायाभूत सुविधा उभारण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन 'आत्मा'चे प्रकल्प संचालक यांनी केले आहे. या मोहिमेचा एक भाग म्हणून १० जुलै २०२६ रोजी सकाळी १० वाजता लातूर येथील कृषी विज्ञान केंद्र येथे एका दिवसीय विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेला उपस्थित राहण्याचे आवाहनही त्यांनी केले आहे.

ऑगस्ट २०२० मध्ये 'आत्मनिर्भर भारत' अभियानांतर्गत सुरू झालेल्या या योजनेचा मुख्य उद्देश पीक काढणीनंतरच्या पायाभूत सुविधा आणि सामुदायिक शेतीसाठी आवश्यक सुविधांची निर्मिती करणे हा आहे. यामुळे शेतमालाचे मूल्यवर्धन, साठवणूक, प्रक्रिया आणि वाहतूक यांना मोठी चालना मिळून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होत आहे. या योजनेअंतर्गत बँकांमार्फत मंजूर होणाऱ्या रु. २ कोटींपर्यंतच्या कर्जावर ३ टक्के व्याज सवलत तसेच शासनामार्फत क्रेडिट गॅरंटीची सुविधा उपलब्ध करून दिली जाते.

या निधीचा वापर करून गोदामे, शीतगृहे, पॅक हाऊस, ग्रेडिंग व सॉर्टिंग युनिट, प्राथमिक प्रक्रिया केंद्रे, कृषी लॉजिस्टिक्स, सायलो, रिपनिंग चेंबर, ई-मार्केट सुविधा, जैव-इनपुट उत्पादन युनिट आणि कस्टम हायरिंग सेंटर यांसारख्या विविध कृषी पायाभूत सुविधा प्रकल्पांची उभारणी करता येते. या योजनेसाठी वैयक्तिक शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपन्या, प्राथमिक कृषी पतसंस्था, सहकारी संस्था, कृषी उद्योजक, स्टार्टअप्स, स्वयं सहायता गट आणि कृषी क्षेत्रातील इतर पात्र संस्था अर्ज करू शकतात.

या विशेष मोहिमेदरम्यान जिल्ह्यात व्यापक जनजागृती, शेतकरी मेळावे, कार्यशाळा आणि बँक समन्वय बैठकांचे आयोजन केले जात आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी सर्व पात्र शेतकरी व संस्थांनी https://agriinfra.dac.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर आपले अर्ज सादर करावेत तसेच अधिक माहितीसाठी आपल्या तालुका कृषी अधिकारी, आत्मा कार्यालय, कृषी विभाग किंवा जवळच्या राष्ट्रीयीकृत व अनुसूचित बँकेशी संपर्क साधावा, असे प्रशासनातर्फे प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.

## प्लास्टिक बंदीची प्रभावी अंमलबजावणी करा; जिल्हाधिकारी भारत बास्टेवाड यांना संजय राजुळे यांचे निवेदन

**लातूर/प्रतिनिधी :**महाराष्ट्रात प्लास्टिक कॅरीबॅगवर बंदी असतानाही लातूर जिल्ह्यात अनेक ठिकाणी त्याचा सर्रास वापर होत असल्याच्या पार्श्र्वभूमीवर आपले आरोग्य, आपलीच जबाबदारी अभियानाचे अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते संजय राजुळे यांनी जिल्हाधिकारी श्री. भारत बास्टेवाड यांची भेट घेऊन प्लास्टिक बंदीची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत निवेदन सादर केले.

निवेदनामध्ये जिल्हाभर विशेष तपासणी मोहीम राबवून प्लास्टिक कॅरीबॅगची निर्मिती, विक्री, साठा, वितरण व वापर करणाऱ्यांवर कठोर दंडात्मक



कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली. तसेच शासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालये, बाजारपेठा व सार्वजनिक ठिकाणी प्लास्टिकमुक्त अभियान प्रभावीपणे राबविणे, नागरिकांमध्ये जनजागृती करणे आणि कापडी पिशव्यांच्या वापराला प्रोत्साहन देण्याची विनंती करण्यात आली.

याशिवाय महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, महानगरपालिका, नगरपालिका, ग्रामपंचायती व संबंधित विभागांच्या संयुक्त विद्यमाने नियमित तपासणी मोहीम राबवून प्लास्टिक वापरावर प्रभावी नियंत्रण आणावे, अशीही मागणी करण्यात आली.

यावेळी संजय राजुळे म्हणाले, पर्यावरण संरक्षण, नागरिकांचे आरोग्य आणि स्वच्छ भविष्यासाठी प्लास्टिकमुक्त लातूर ही काळाची गरज आहे. प्रत्येक नागरिकाने प्लास्टिक पिशव्यांना कायमचा निरोप देऊन कापडी पिशवीचा स्वीकार करावा. जिल्हाधिकारी श्री. भारत बास्टेवाड यांनी निवेदन स्वीकारून संबंधित विभागामार्फत आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्र्वासन दिले. यावेळी संपादक दत्तात्रय परळकर व वीरभद्र तरगुडे उपस्थित होते.

## लातूर तालुका संजय गांधी निराधार योजना समितीची बैठक; १३६८ अर्जाची छाननी





**लातूर/प्रतिनिधी :** लातूर तालुका संजय गांधी निराधार योजना समितीची बैठक लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या सूचनेनुसार ८ जुलै २०२६ बुधवार रोजी घेण्यात आली असून समितीचे अध्यक्ष बन्सी भगवानराव भिसे यांच्या अध्यक्षतेत झालेल्या पहिल्या बैठकीत प्रत्यक्ष दाखल केलेल्या ३०० अर्जाची छाननी करून २८० अर्ज मंजूर करण्यात आले तर उर्वरित ऑनलाईन दाखल केलेल्या १०६८ अर्जाची छाननी करण्यात येत आहे.

जिल्ह्याचे पालकमंत्री ना. शिवेंद्रसिंह राजे भोसले यांनी लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या शिफारशीनुसार लातूर तालुका संजय गांधी निराधार योजना समिती १३ मे २०२६ रोजीच्या पत्रानुसार गठीत करण्यात आली आहे. गोरगरीब, सर्वसामान्य गरजू पात्र लाभधारकांना, निराधारासह विधवा आणि अपंगांना तात्काळ बैठक घेऊन लाभ द्यावा अशी सूचना आ. रमेशआप्पा कराड यांनी नव्याने गठीत झालेल्या समितीस केली होती. सदरील सूचनेनुसार ८ जुलै बुधवार रोजी समितीचे अध्यक्ष बन्सीभाऊ भिसे यांच्या अध्यक्षतेखाली लातूर तहसील कार्यालयात बैठक झाली.

या बैठकीत प्रत्यक्ष दाखल केलेले ३०० अर्ज आणि ऑनलाईन दाखल केलेले १०६८ असे एकूण १३६८ अर्ज ठेवण्यात आले होते त्यापैकी प्रत्यक्ष दाखल केलेल्या ३०० अर्जाची छाननी करून २८० अर्जांना मंजुरी देण्यात आली तर उर्वरित त्रुटी असल्याने २० अर्ज नामंजूर करण्यात आले. उर्वरित ऑनलाईन दाखल केलेल्या अर्जाची छाननी करण्यात येत आहे. बैठकीच्या प्रारंभी समिती सचिव तथा तहसीलदार सौदागर तांदळे यांनी समितीचे अध्यक्षासह सर्व सदस्यांचा सत्कार करून स्वागत केले.

लातूर तालुका संजय गांधी निराधार योजना समितीच्या बैठकीस समितीचे अध्यक्ष बन्सी भगवानराव भिसे, सचिव तथा तहसीलदार सौदागर तांदळे, सदस्य तथा गटविकास अधिकारी श्याम गोडभरले, सदस्य परमेश्वर माधवराव पर्वते, सौ स्वाती किशोर घुट्टे, संतोष नारायण गायकवाड, अंकुश हरिभाऊ कुंभार, विनायक मल्हारी मगर, सदाम रशीद शेख, सदाशिव सोपान गव्हाणे, रुपेश सूर्यकांत काळे, बाबासाहेब साहेबराव भिसे यांच्यासह नायब तहसीलदार परमेश्वर कांबळे, सौ सुषमा कोपरकर, महेश आदमाने आदी तहसील कार्यालयातील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.